(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**वनजमीन-यवतमाळ**

**मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड,नागपूर यांना पुसद-भोजला-जामबझार-चिखली-पारवा-लाखी, प्रजिमा-३२ या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यालगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरिता पुसद वन विभागातील ०.११८ हे. राखीव वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-३६१७/प्र.क्र.३३२/फ-१०**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२**
**दिनांक : ११.०९.२०१७**

**प्रस्तावना :-**

मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, नागपूर यांनी पुसद-भोजला-जामबझार-चिखली-पारवा-लाखी, प्रजिमा-३२ या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यालगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरिता पुसद वन विभागातील ०.११८ हे. राखीव वनजमीन वन (संवर्धन)अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या सविस्तर छाननीअंती त्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

भारत सरकारच्या आदेश क्रमांक, एफ.नं.११-९/९८-FC, दि.१६.१०.२००० आणि दि.०७.०९.२०१५ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुसद-भोजला-जामबझार-चिखली-पारवा-लाखी ,प्रजिमा-३२ या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्यालगत ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकण्याकरिता पुसद वन विभागातील ०.११८हे .राखीव वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करण्याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/एनसी/आय/आयडी-/१०३१/१७-१८, दि.२७.०७.२०१७ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास तत्त्वत: मंजूरी देत आहे. वनजमिनीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| कामाचे स्वरूप | गाव, जिल्हा | स. नं. | ग. नं. | Compt. No. | लांबी x रूंदी | चौ.मी. | क्षेत्र (हे.) | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकणे | हौसापूर, जि.यवतमाळ | ८ | ३३ | ३७८ | २६३५ x ०.४५ | ११८५.७५ | ०.११८ | राखीव वन |

२. सदर तत्वत: मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) सदर ऑप्टिकल फायबर केबल जास्तीत जास्त १.०० मीटर खोल व ०.४५ मीटर रुंदीच्या चरामध्ये (खंदक) टाकण्यात यावी. सदर केबलवर पीव्हीसी पाईपचे आवरण असावे.

३) प्रकल्पासाठी वापरात आणलेली जमीन प्रकल्प यंत्रणेव्दारे पूर्वस्थितीत आणली जाईल, अशा आशयाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेस सादर करावे लागेल. तसेच, वापरात येणा-या जमिनीकरीता प्रति मीटर रुपये ५०/- या दराने प्रकल्प यंत्रणेस बँकेचे हमीपत्र सादर करावे लागेल. जर संबंधित उपवनसंरक्षक यांच्या मते प्रकल्पासाठी वापरात आणलेल्या जमिनीचे पूर्वस्थितीकरण समाधानकारकरीत्या झाले नसेल, तर त्यापोटीचा खर्च बँकेचे हमीपत्र वटवून वसूल केला जाईल.

४) जर अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या रुंदीमधूनच ऑप्टीकल फायबर केबल टाकावी लागत असेल तर, प्रति मीटर रुपये ३५/- या दराने प्रकल्प यंत्रणेस बँकेचे अतिरिक्त हमीपत्र सादर करावे लागेल. रस्त्याच्या बाजूने होणारे खोदकाम तसेच डांबरी भागाचे झालेले नुकसान पूर्ववत करणे आवश्यक राहील व यासाठी अनुक्रमे प्रति मीटर रुपये ३००/- व प्रति मीटर रुपये ७५०/- या दराने प्रकल्प यंत्रणेस बँकेचे हमीपत्र सादर करावे लागेल. ऑप्टीकल फायबर केबल टाकताना व भविष्यात त्याची देखभाल करतेवेळी वनक्षेत्राची किंवा पर्यावरणाची झालेली कोणत्याही स्वरुपाची हानी भरुन काढली जाईल, अशा आशयाचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेस सादर करावे लागेल.

५) प्रकल्पाच्या भविष्यातील देखभालीच्या कामाकरीता आवश्यकतेनुसार संबंधित उपवनसंरक्षक यांची परवानगी घेणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

६) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

७) प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता वृक्षतोड करण्यात येणार नाही.

८) अटी पूर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर संरक्षित क्षेत्राच्या मर्यादेबाहेर ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यास प्रकल्प यंत्रणेस मूभा राहिल. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

९) प्रकल्प यंत्रणेस ऑप्टीकल फायबर केबल टाकताना अस्तित्वातील रस्त्यालगतचे मंजूरी नसलेले इतर वनक्षेत्र वापरता येणार नाही.

१०) प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून भरण्यात येणारी सर्व रक्कम ॲडहोक-कॅम्पाचे कॉर्पोरेशन बँक, एफसीएस बंगळुरू २१/१, तिसरा मजला, जेलिटा टॉवर्स मिशन रोड, बंगळुरू-५६००२७ येथील खाते क्र.१५०७८MIN५८१५२००९६९३ मध्ये जमा करण्यात यावी व त्याचा तपशील सादर करण्यात यावा.

११) प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने १.०० हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्यात यावे.

१२) प्रकल्प यंत्रणेव्दारे प्रचलित दरपद्धतीनुसार पर्यायी वनीकरणापोटी भरण्यात आलेल्या रकमेचा तपशील तसेच दरम्यानच्या कालावधीत नवीन नियमांनुसार भरण्यात आलेल्या इतर रकमांचा तपशील मुख्य वनसंरक्षक (प्रा.),यवतमाळ सादर करतील.

१३) वनविभागाने घातलेल्या सर्व अटी प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक राहतील.

१४) सदर प्रकल्पाकरीता माहिती व तंत्रज्ञान विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अटींच्या अधीन राहून तत्वत: मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१५) प्रकल्पाकरीता वनजमिन वापरल्यानंतर प्रकल्प यंत्रणा वनजमिन पूर्ववत करेल.

१६) प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख) यांना आवश्यक वाटतील अशा इतर अटी.

३. प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमीन वळतीकरणास अंतिम मंजूरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१११७२८५८४६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrashekhar D Tarange

Digitally signed by Chandrashekhar D Tarange
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fb8c9383a2159ef0954b8bea7a4de7769b9a2308eccebd89cbd1dd3f1964f665, cn=Chandrashekhar D Tarange
Date: 2017.09.11 17:23:08 +05'30'

**(चंद्रशेखर तरंगे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. सचिव, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.

३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. विभागीय आयुक्त, अमरावती.
८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर
९. मुख्य वनसंरक्षक (प्रा), यवतमाळ
१०.जिल्हाधिकारी, यवतमाळ
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,यवतमाळ
१२.उपवनसंरक्षक,पुसद,जि.यवतमाळ
१३.मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेड, ई-३,MIDC,हिंगणा रोड, नागपूर.
१४. निवडनस्ती (फ-१०)

**Forest Land-Yavatmal.**

Diversion of 0.118 ha. of Reserved Forest land for laying of Optical Fiber Cable in favour of M/s. Reliance JIO Infocomm Ltd., Nagpur passing within the existing ROW of Pusad-Bhojala-Jambazar-Chikhali-Parwa-Lakhi,MDR-32, PWD Road in Comptt. No. 378 of Pusad Division, Pusad.

**Government of Maharashtra**

**Revenue and Forest Department**

**Government Resolution No.FLD-3716/C.R.332/F-10**

**Mantralaya, Mumbai-400 032.**

**Date:11.09.2017**

## Preamble:

M/s Reliance JIO Infocomm Limited, Nagpur has submitted a proposal for diversion of 0.118 ha. Reserved Forest land for Optical Fiber Cable passing within the existing ROW of Pusad-Bhojala-Jambazar-Chikhali-Parwa-Lakhi,MDR-32, PWD Road in Comptt. No. 378 of Pusad Division, Pusad. to the State Forest Department. After careful consideration and scrutiny of the proposal, the Government is pleased to grant in-principle approval as under-

## Resolution:

In exercise of powers delegated to the State Government, vide Government of India's order F.No.11-9/98-FC, dtd. 16.10.2000 and dtd. 07.09.2015 Government of Maharashtra is pleased to grant in principle approval to the diversion of forest land under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980, for diversion of 0.118 ha. Reserved Forest land as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, vide his letter no.Desk-17/NC/I/I.D./1031/17-18,dated 27.07.2017 for Optical Fiber Cable passing within the existing ROW of Pusad-Bhojala-Jambazar-Chikhali-Parwa-Lakhi,MDR-32, PWD Road in Compt. No. 378 of Pusad Division. The details are as follows :-

| Item | Village, District | Survey No. | Gut No. | Compt. No. | Length Width | Sq. Mt. | Area (in ha.) | Legal Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Laying Optical Fiber Cable Line | Housapur<br><br>Dist-Yavatmal | 8 | 33 | 378 | 2635 x 0.45 | 1185.75 | 0.118 | Reserved Forest |

2. This in-principle approval is issued subject to the following conditions-
   1) The legal status of the land shall remain unchanged.
   2) The Optical Fiber Cable Line will be laid within maximum size of the trench of 1.0 m depth & 0.45 m width with cable line under the PVC Pipeline.
   3) The land under project will be reclaimed by the user agency for which the agency shall submit a bank guarantee at the rate of Rs.50 per running meter and an undertaking to that effect shall also be submitted. If the agency fails to reclaim the land to the satisfaction of concerned Deputy Conservator of Forests, the cost for reclamation will be recovered from the bank guarantee.
   4) If the cable is going to be laid in the formation width of the road, then additional charges in form of bank guarantee at the rate of Rs.35/- per running meter. Similarly for reclamation of side drain and for tarred portion, the gurantee will be at the rate of Rs.300/- per meter and Rs.750/- per meter respectively. An undertaking shall be obtained from the User Agency that it has agreed to make good any loss to Forest/Environment while laying the cable in the forest area and during maintenance of the same in future.
   5) For further maintenance of the project, the agency shall obtain permission from the concerned Deputy Conservator of Forests as and when required.

6) The forest land shall not be used for any purpose other than specified in the proposal.
7) No felling of trees shall done during the implementation of the project.
8) The user agency will be authorized to lay the Optical Fiber Cable outside the confines of the protected area after compliance of this order. Any breach of conditions by the user agency will be treated as violation of the Provision of Forest (Conservation) Act, 1980.
9) No new forest area beyond the Right of Way of existing road should be broken for laying Optical Fiber Cable.
10) All the amount received from the User Agency under the project shall be transferred to the Adhoc Compensatory Afforestation Fund Management & Planning Authority (CAMPA) in the A/C No. 15078MIN58152009693 in Corporation Bank, FCS Bangalore 21/1, 3rd Floor Jellita Towers Mission Road, Bangalore-560027 and compliance will be reported to this office.
11) The Compensatory afforestation will be raised on 1.00 ha. of suitable degraded forest land at the cost of project authority.
12) The Chief Conservator of Forests (T), Yavatmal shall report the details of amount recovered from the Project Authority towards the cost of compensatory afforestation at prevalent rate and all other cost required as per rules in due course of time.
13) All the conditions stipulated by the Forest Department shall be binding on the User Agency.
14) This sanction is subject to the final clearance by the Department of Information & Technology for the Project and Pusad-Bhojala-Jambazar-Chikhali-Parwa-Lakhi, MDR-32, PWD Road.
15) The User Agency will make the land good after use/maintenance.
16) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.

3. The Final approval shall be granted by the State Government after fulfillment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the Chief Conservator of Forests (T), Yavatmal.

This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201709111728584619. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Chandrashekhar D Tarange

Digitally signed by Chandrashekhar D Tarange
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fb8c9383a2159ef0954b8bea7a4de7769b9a2308eccebd89cbd1dd3f1964f665, cn=Chandrashekhar D Tarange
Date: 2017.09.11 17:23:25 +05'30'

**(Chandrashekhar Tarange)**
Under Secretary to the
Government of Maharashtra

**Copy to:**
1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), West Central Region, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur
3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur
4. Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur

5. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur
6. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur
7. The Divisional Commissioner, Amaravati Division, Amaravati.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (T), Yavatmal.
10. Collector, Yavatmal.
11. Chief Executive Officer, Zilla Parishad, Yavatmal.
12. Deputy Conservator of Forests, Pusad Division, Pusad, Dist. Yavatmal.
13. M/s Reliance JIO Infocomm Limited, E-3, MIDC, Hingana Road, Nagpur.
14. Select File-F-10.